ग्रामपंचायत वाघापूर स्थापना १५/४/१९५२ ता.भुदरगड जि.कोल्हापूर



गावसभा क्र ६.

ग्रा. पं. वाघापूर

| | | |
|---|---|---|
| | | मजकूर ग्रा.पं. वाघापूर ता.भुदरगड येथील ग्रामपंचायत गावसभा दि. २६।१।२००४ रोजी स. ११.०० वा. ग्रा.प. कार्यालयात झाली असता झालेल्या सभेस एकूण ... मतदार नागरिक उपस्थित होते नियमाप्रमाणे सभेचा कोरम पूर्ण होवून मा. सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. |
| विषय क्र | १ | मागील सभेचे प्रोसीडिंग वाचून कायम करणे |
| ठराव क्र | २८ | मजकूर ग्रा.पं. ची मागील सभा दि. २१।११।२००३ रोजी झाली असता झालेल्या सभेचे प्रोसीडिंग ग्रामसेवक यांनी लिहिले असून ते जसे घडले तसेच लिहिले आहे असे ठरविण्यात आले त्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>सूचक :- श्री बजरंग गोविंद दाभोळे<br>अनुमोदक :- श्री. [illegible] बापूसो भोई<br>ठराव सर्वानुमते पास |
| विषय क्र | २ | गावच्या विकास कामाबाबत चर्चा करणे |
| | १ | गट नं २ मध्ये क्रीडांगण करणे बाबत चर्चा करणे |
| ठराव क्र | २९ | मौजे वाघापूर येथील आजच्या गावसभेमध्ये गट क्र २ मध्ये क्रीडांगण करणेबाबत ग्रामस्थांनी चर्चा केली तेव्हा गट नं २ हा ३८ गुंठे क्षेत्राचा असून पैकी महार समाजाची स्मशान भूमी करिता ३ गुंठे तलाव ९ गुंठे व पड ०.२५ गुंठे अशी नोंद आहे तेव्हा महार समाजाच्या स्मशानभूमी ठिकाणाबाबत निश्चित असा निर्णय होणे आवश्यक आहे. ठिकाण निश्चितीबाबत सर्व कुटुंबानी (महार समाजातील) लेखी संमती क्रीडांगणासाठी शासनास देणे आवश्यक आहे. तसेच या गट नं. २ चे मालकी हक्क सदरी सरकार असा उल्लेख असलेने या जागेवर कोणतीही खुदाई बांधकाम अथवा हस्तांतरण इत्यादी महाराष्ट्र शासन यांचे लेखी आदेशाने करणेचे आहे अशी माहिती ग्रामसेवक यांनी सभागृहास दिली त्यावर विचार विनिमय होवून या क्रीडांगणास डॉ बाबासाहेब आंबेडकर क्रीडांगण असे नामकरण करून महार समाज स्मशान भूमी साठी ३ गुंठे जागा अबाधित राखून उर्वरित ३६ गुंठे जागेवर क्रीडांगण करणेस महाराष्ट्र शासनाच्या |

ग्रामपंचायत वाघापूर * ता.भुदरगड, जि.कोल्हापूर
स्थापना २५/८/१९५८

सरकारी जमिनीस लागू असलेल्या कायद्याच बाधीत राहून ना हरकत ही ग्रामसभा देत आहे. असे ठरविण्यात आले.

सूचक :- श्री. बिरदेव ओतीशिंग कावेरे

अनुमोदक :- श्री. संजय आनंदा फराकटे

ठराव सर्वानुमते पास

वरील प्रमाणे ग्राम पंचायत वाघापूरची ग्राम सभा दि. २८/१/२००८ रोजीच्या प्रोसीडिंग वृत्तांताची खरी नक्कल असे दि. १५/५/२०२५

सरपंच
ग्रामपंचायत वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर.

विषय क्र ८ गावी नविन क्रिडांगणासाठी जागा उपलब्ध करणे बाबत

ग्रामसभेत क्रिडांगणाच्या जागेबाबत चर्चा आली त्यानुसार गावी गट क्र 2 (गळे) मध्ये ३८ गुंठे जागा असुन त्यापैकी ३ गुंठे महार स्मशान भुमी ४ गुंठे गळे व ३१ गुंठे पड अशी कब्जेदारी असुन सदरची जागा मह ७/१२ उताऱ्यावरती महाराष्ट्र शासन असे नमुद आहे तरी सदर गळ्यामधील माती काढुन व मुरुम घालुन मुलांना ग्राउंड करुन देणेचे ठरले व भविष्यात कोणताही शासकिय निधी खर्च करुन मोठे क्रिडांगण करावे व सदर क्रिडांगणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडांगण असे नाव देणेत यावे असे सर्वानुमते ठरले त्यास ही सभा मंजुरी देत आहे

सुचक - श्री किरण शंकर कुरडे

अनुमोदक - श्री बाबालो सखाराम जहार

ठराव सर्वानुमते पास

नोंदी प्रमाणे ग्रा.पं. वाघापुरची ग्राम सभा दि. २८।१।२०१३ रोजीच्या प्रोसिडिंग उताऱ्याची खरी नक्कल असे दि. १३।५।२०२५

सरपंच
ग्रामपंचायत वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर

ग्रामसभा क्र ५ दि. २६।१।२०१३.

ग्राम पंचायत मौजे वाघापूर ता. मुखेड कडील [illegible] दि. २६।१।२०१३ ई. रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रा.पं. कार्यालयात भरली त्या वेळी हजेरी बुक प्रमाणे १ ते ९०६ ग्रामस्थ हजर राहिल्याने व नियमाप्रमाणे सभेच्या कोरम पुर्ण झाल्याने मा. सरपंच सौ यांनी सभेचे अध्यक्ष पद स्विकारल्याने सभेच्या कामकाजास सुरुवात झाली

विषय नं. १ - मागिल सभेचे प्रोसिडींग वाचुन कायम करणे

ठराव नं. - मागिल ग्राम सभा दि. २।१०।२०१२ चे प्रोसिडींग ग्रामसेवक यांनी सभासमोर वाचन करुन दाखविले त्यावर चर्चा होवुन लिहिलेले प्रोसिडींग योग्य व बरोबर असल्याने ठराव पास करण्यात आला

सुचक - संजय [illegible] घाटगे

अनुमोदक - बालाराम तुकाराम कोबडे

ठराव सर्वानुमते पास

ग्रामपंचायत वाघापूर * ता.भुदरगड, जि.कोल्हापूर * स्थापना १५/४/१९५२

ठराव सर्वानुमते पास

९) नळ्याची मोजणी करणे बाबत व ग्राउंडला डॉ. आंबेडकरांचे नाव देणे बाबत –

४०१८ मौजे वाघापूर गावची लोकसंख्या जवळ जवळ ७ हजार असुन तरुण मुलांना व्यायाम साठी व खेळण्यासाठी ग्राउंड उपलब्ध नाही त्यासाठी गट नं.२ (नळे) ची जागा उपलब्ध असुन त्या नळ्याच्या भोवती अतीक्रमणाचा विळखा आहे तरी भुमिअभिलेख कडुन सदर नळ्याची मोजणी करुन ~~सार्वजनिक~~ खेळण्यासाठी ग्राउंड उपलब्ध करुन त्या ग्राउंडला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले

सुचक – सचिन दौलतराव घोरपडे

अनुमोदक – संग्राम आनंदा घाटगे

ठराव सर्वानुमते पास

१०) उस. एफ आर. पी प्रमाणे मिळणे बाबत

येणे प्रमाणे ग्राम पंचायत वाघापुरची ग्राम सभा दि. २६।१।२०१५ रोजीच्या प्रोसीडींग उताऱ्याची खरी नक्कल असे दि. १५।५।२०२५

सरपंच
ग्रामपंचायत वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर

ग्रामपंचायत वाघापूर ★ स्थापना १५/६/१९५२ ★ ता.भुदरगड, जि.कोल्हापूर



## ग्रामसभा क्र. ८

स्थापना १५/६/५२ भुदरगड जि. कोल्हापूर

ग्राम पंचायत मौजे वाघापूर ता. भुदरगडची ग्रामसभा दि. २६।१।२०१५ इ. रोजी सकाळी ११ वाजता ग्राम पंचायत कार्यालयात झाली. त्यावेळी एकुण ११२ सभासद हजर झाल्यावर मे. सरपंच यांचे अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरवात झाली.

विषय नं. १ - मागील सभेचे प्रोसिडिंग वाचुन कायम करणे

ठराव नं ३५ - ग्रा. पं. वाघापूरची मागील ग्राम सभा दि. ३१।१२।२०१४ इ. रोजी ग्रा. पं. कार्यालयात झाली त्यावेळी लिहीलेले प्रोसिडिंग ग्रामविकास अधिकारी यांनी सभेसमोर वाचुन दाखविले त्यावर रितसर चर्चा होवुन लिहिलेले प्रोसिडिंग बरोबर असल्याची खात्री करुन ठराव पास करणेत आला त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक - श्री. दिनेश शिवाजी पाटील

अनुमोदक - श्री. किरण शंकर कुरडे

ठराव सर्वानुमते पास

विषय नं. २ निर्मल भारत अभियान राबविणे बाबत

!! श्रम, सेवा, विकास !! "सत्यमेव जयते" स्थापना : १५/४/१९५२

# ग्रामपंचायत वाघापूर

ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.

- ग्रा. पं. कराची रक्कम मुदतीत भरून सहकार्य करा.
- आपला परिसर स्वच्छ ठेवा, कचरा कचरा कुंडीत टाका.
- एडस् म्हणजे मृत्यू/कुटूंब लहान सुख महान.
- स्थानिक जन्म-मृत्यूची नोंद २१ दिवसांच्या आत ग्रा. पं. कडे करा.
- पाण्याचा अपव्यय टाळा, नळांना तोट्या बसवा.
- आपले सांडपाणी शोषखड्ड्यांमध्ये किंवा परसबागेत सोडा.

जावक नं. ___

तारीख : ३ / ३ /२०२५

मौजे वाघापूर मासिक सभा दि २४/०२/२०२५ चा कारणा पूरता उतारा

विषय नं ८ - आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करणे

०८/०२ मौजे वाघापूर गावी क्रिडांगणासमोर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची नावाची स्वागत कमाण करणे बाबत

ठराव नं ०८/०२ - मौजे वाघापूर गावी अनूसूचित जातीची लोकसंख्या ६५० इतकी असून गट नं २ मध्ये ३९ गूंठे जागा असून सदर जागेवर वाहनतळ असून सदर जागेमध्ये मागावर्गीय समाजाची ३ गूंठे जागा दफन भूमीसाठी राखीव होती परंतू सदर ठिकाणी दफन विधीची जागा वाहनतळासाठी वापरात घेतली असनू त्याठिकाणी वाहतळासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाची स्वागत कमान करणे बाबत समाजातील लोकांची मागणी होत आहे तरी सदरचे काम छत्रपती शाहू महाराज खासदार कोल्हापूर यांचे फंडातून करणे बाबत चर्चा होवून पत्र व्यवहार करणे बाबत चर्चा झाली त्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक - श्री सागर गणपती कांबळे
अूनमोदक -सौ संगिता शिवाजी गूरव

ठराव सर्वानूमते पास

येणे प्रमाणे असे दि

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर.

सरपंच